# बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार

## कर्जतमध्ये बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा राष्ट्रवादीच्या मेळाव्यात निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य देण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसची राहील, अशी ग्वाही मावळचे आमदार सुनील शेळके यांनी आज (शुक्रवारी) दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याच्या निमित्ताने रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले.




व्यासपीठावर खासदार बारणे, आमदार शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुधाकर घारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस हनुमंत पिंगळे, दत्तात्रय म्हसुरकर, अशोक भोपतराव, भगवान भोईर, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, कर्जतचे तालुकाध्यक्ष भगवान चंचे, खालापूरचे तालुकाध्यक्ष संतोष बेलमारे तसेच एच आर पाटील, भरत भगत, शिवाजी खारीक, अंकित साखरे, रजनीताई धुळे, प्राची पाटील, संभाजी जगताप, स्वप्निल भालकर, अक्षय पिंगळे, भाई कोतवाल, हिराजी पाटील आधी पदाधिकारी उपस्थित होते.

कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघात सुधाकर घारे यांच्या रूपाने एक कर्तृत्ववान तरुण नेता राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला आहे. या नेत्याला भविष्यात न्याय मिळावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम करावे, असे आवाहनही शेळके यांनी केले.

खासदार बारणे यांनी तालुक्यात केलेल्या विविध विकास कामांचा आढावा सादर केला. कर्जत तालुक्यातील तुंगी सारख्या आदिवासी खेड्यात स्वातंत्र्यानंतर 70 वर्षांनी वीज आणि रस्ता पोहोचवता आला, याचा विशेष आनंद आहे, असं ते म्हणाले. अटल सेतू, मेट्रो यासारख्या मोठ्या कामांबरोबरच शासकीय योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. अजूनही याबाबत अनेक विकास कामे प्रस्तावित आहेत, असे त्यांनी सांगितले. मावळचे मतदार विकासाच्या बाजूनेच मतदान करतील, असा विश्वास बारणे यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीनंतरही महायुती कायम राहणार आहे. महायुतीच्या वतीने भविष्यात कोणाला संधी दिली जाईल, याचा निर्णय केंद्र व राज्याचे नेतृत्व घेईल. पण निवडणुकीत सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाची जाणीव आपण सदैव ठेवू, अशी ग्वाही बारणे यांनी दिली.

एकनाथ धुळे यांनी प्रास्ताविक केले. सुधाकर घारे, दत्तात्रय म्हसुरकर, उमाताई मुंडे, अशोक भोपतराव, हनुमंत पिंगळे, रंजना धुळे आदींची यावेळी भाषणे झाली.

### धनुष्यबाण चालवण्याचा आदेश

**» गेल्या लोकसभा निवडणुकीत मी स्वतः पार्थ पवार यांच्या विरोधात काम केले होते, तरी देखील अजितदादांनी मला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेतले. आमदार केले आणि मावळ तालुक्याच्या विकासासाठी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांचा निधी देखील दिला. अशा नेत्याच्या शब्दासाठी आपण काहीही करू शकतो. अजित पवार यांनी मावळात धनुष्यबाण चालवण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे बारणे यांना सर्वाधिक मताधिक्य देण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर आहे.**

# मतदान करा अन् 50 रुपयांचे पेट्रोल मोफत मिळवा!

## पेट्रोल डिलर्स असोसिएशन : मतदान करा अन् 50 रुपयांचे पेट्रोल मोफत मिळवा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशन फक्त मोफत पेट्रोल देऊन थांबणार नाही. तर घरोघरी जाऊन जनजागृती करणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठीही मदत करणार आहे. मतदानाच्या दिवशी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना मदत करणार आहे.

देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. मतदानाचे दोन टप्पे पूर्ण झाले आहेत. या दोन्ही टप्प्यात विदर्भातील मतदारांनी उत्साह दाखवला नाही. विदर्भात यंदा २०१९ पेक्षा कमी मतदान झाले. या कमी मतदानाचा फटका कोणाला बसणार? याचा निर्णय ४ जून रोजी होणार आहे. परंतु पुणेकरांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी



प्रयत्न सुरु केले आहे. नागरिकांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडल्यास त्यांना ५० रुपयांचे पेट्रोल मोफत देण्यात येणार आहे. 'व्होट कर पुणेकर' या मोहिमेअंतर्गत मतदान करुन एक लिटर ऑईल खरेदी करणाऱ्यास ५० रुपयांचे पेट्रोल मोफत देण्यात येणार आहे. पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशने ही मोहीम सुरु केली आहे.

पेट्रोल डिलर्स असोसिएशन फक्त मोफत पेट्रोल देऊन थांबणार नाही. तर घरोघरी जाऊन जनजागृती करणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठीही मदत करणार आहे. मतदानाच्या दिवशी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना मदत करणार आहे. या पोलीस कर्मचाऱ्यांना २० हजार पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने मतदान केंद्र शोधण्यासाठी HTTPS://ELECTORALSEARCH.IN या वेबसाईटवर माहिती उपलब्ध करुन दिली आहे. देशभरातील मतदान केंद्राची माहिती त्यावर आहे. 'व्होट कर पुणेकर' या मोहिमे अंतर्गत आणखी एक सुविधा दिली आहे.HTTP://WWW.VOTEKARPUNEKAR.COM हे संकेतस्थळ सुरू केले आहे. त्यावर पुणेकर मतदार केंद्र शोधू शकतील. क्यूआर कोड स्कॅन करूनही मतदान केंद्राचा शोध घेता येणार आहे.

### काय आहे योजना

**» पुण्यातील पेट्रोल डिलर्स असोसिएशनने महा एनजीओ फेडरेशन आणि इतर स्वयंसेवी संस्थांना सोबत घेतले आहे. या संस्थांसोबत 'व्होट कर पुणेकर' मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार मतदान करुन आल्यानंतर बोटावरील शाई दाखवली आणि एक लिटर ऑईल खरेदी केले तर त्यांना ५० रुपयांचे पेट्रोल मोफत मिळणार आहे. पुणे लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर २० मेपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे, अशी माहिती पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिली.**